सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज...४३...ठ. क्र....३८ दि...२५.१.८.१९८.... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३४८
२०९८

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २२ मधील तरतूदीप्रमाणे श्री. तौफिक इस्माईल शेख उर्फ पैलवान हे स्थायी समितीचे सदस्य म्हणून असण्याचे बंद झालेने सदर रिक्त झालेल्या एका (१) जागेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २३ प्रमाणे अशी रिकामी झालेली जागा त्या जागी एखाद्या व्यक्तीची नेमणूक करुन सोईस्करपणे शक्य तितक्या लवकर भरण्यात येईल आणि अशी व्यक्ती, ज्या व्यक्तीच्या जागी तिची नेमणूक करण्यांत आली असेल त्या व्यक्तीस ती जागा रिकामी झाली नसती तर ज्या मुदतीपर्यंत पद धारण करण्याचा हक्क असता त्या मुदतीपर्यंत सदस्य म्हणून पद धारण करील. याप्रमाणे नेमणूक होऊन मिळणेस्तव मा.आयुक्त यांचे दि.३०-६-१७ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

**(टीप :-** मा.स्थायी समिती व मा.परिवहन समिती सदस्यांची नियुक्ती ही मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३१-अ मधील तरतुदीनुसार मान्यता प्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलनीक संख्याबळानुसार नेमणूक मा.महानगरपालिकेने करणेचे आहे. ही नेमणूक करताना सभागृहनेता, विरोधी पक्षनेता आणि अशा पक्षाचे व गटाचे नेत्यांच्या सल्ल्यानुसार कार्यवाही ठेवावी लागणार आहे. मा.शासनाच्या उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार ही कार्यवाही करणेची आहे. तसेच नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील परिपत्रक क्र.- संकीर्ण-२०१०/प्रक्र-०८५/नवि-३२ दिनांक ६ जुलै २०१० च्या परिपत्रकानुसार महानगरपालिकेच्या स्थायी समितीसह विविध समित्यांवर सदस्य नामनिर्देशित करताना अनुसरावयाची कार्यपध्दतीनुसार कार्यवाही ठेवावी लागणार आहे. मा. शासनाच्या उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार ही कार्यवाही करणेची आहे.)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २३ अन्वये मा.स्थायी समितीच्या एका सदस्यपदी खालील प्रमाणे नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

मा. तस्लीम इरफान शेख (एम.डी.)

(signature) P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष सर्व साधारण सभेपुढ विषय क्र.ज ..४४..ठ. क्र.......४० दि..१६/९/१७..... राजी ठवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर शहरातील सध्याचे असलेले स्ट्रीट लाईट काढून त्या ठिकाणी LED स्ट्रीट बसविणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सोलापूर शहरामध्ये सध्या वापरत असलेले पथदिवे उदाः सोडीयम व्हेपर, टयुब, मेटल हेलाईड, T-५ इ. प्रकारचे असून ते काढून LED फिटींग बसविल्यानंतर प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे अ.क्र. १ ते ६ प्रमाणे फायदे होणार आहेत. EESL या कंपनीने महाराष्ट्रात अमरावती, अकोला, जालना या शहरात नविन तंत्रज्ञानाचा वापर करत आहे. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट सिटी यांनी प्रस्तावात नमूद संदर्भ क्र. ४ अन्वये पत्र देऊन एनर्जी एफिशिएसी सर्व्हिसेस लिमिटेड कंपनी (EESL) कडून संपूर्ण सोलापूर शहरामध्ये सदरची नविन तंत्रज्ञानाची योजना राबविणेबाबत धोरणात्मक निर्णय होऊन मिळणेबाबत कळविलेले आहे व संपूर्ण योजना स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉ.लि. यांचेकडून राबवून त्याचा खर्च स्मार्ट सिटी अंतर्गत करणेत येईल असे नमूद केले आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रस्तावातील नमूद कारणास्तव सोलापूर शहरातील सध्याचे असलेले पथदिवे काढून नविन तंत्रज्ञानानुसार LED स्ट्रीट लाईट EESL या कंपनीकडून बसविणे. सदरचे काम स्मार्ट सिटी कॉ. लिमिटेड यांचे अधिपत्याखाली करुन घेणेस, येणारा खर्च स्मार्ट सिटी फंडातून करणेस मा. सर्वसाधारण सभेची धोरणात्मक मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेकडे पाठविणेस मा. आयुक्त यांचे दि. ११-६-१७ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

मा.आयुवत यांचे दिनांक १३/९/२०१७ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.जाहिर प्रसिध्दीकरण करुन कार्यवाही ठेवल्यानंतर अंतिम निर्णयासाठी मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४५ ...ठ. क्र. ...८९ दि. १६/६/१७ .. रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

मा.आयुक्त यांचे दि.१४-६-२०१७ रोजी टिपणीने आलेल्याप्रकरणाचे अवलोकन केले.

सोलापूर महानगरपालिकेच्या मालकीचे मेजर व मिनी शॉपिंग सेंटर मधील गाळयांचे भाडेपट्टा हे रेडीरेकरन दरानुसार करण्यास व ज्यांची मुदत संपलेली आहे. अशा गाळेधारकांच्यावर कारवाई न करता मुदतवाढीसाठीचे ज्या गाळेधारकांनी अर्ज दाखल केलेले आहेत. त्यांच्याकडून रितसर फी आकारणी करुन मुदतवाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.अ...४६...ठ. क्र....८२
दि..१६/६/१७.... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

एनएचएआय अंतर्गत सोलापूर शहरातील फ्लायओव्हर सेक्शन १ व सेक्शन २ यांच्या रस्ता रुंदीच्या अलाईनमेंट प्रमाणे प्रस्तावित आर.ओ.बी. रस्ता योजना नुसार अस्तित्वाचे रस्त्याचे रुंदीत वाढ होते त्या भागातील रस्त्याचे क्षेत्रात वाढ करुन प्रस्तावित डी.पी. रस्ता करणे बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेर बदल करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदरचा प्रस्ताव हा सोलापूर शहराच्या स्मार्ट सिटी योजनेचा भाग असल्याने अत्यंत महत्वाचा आहे. यासाठी एनएचएआय कडून अंदाजे र.रु. ७०० कोटी खर्च केला जाणार आहे. तथापि यासाठी आवश्यक जागा राज्य शासन/स्थानिक संस्थेने उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. त्यामुळे खाजगी जागा मालकांना द्यावयाचा मोबदला, पोलीस वसाहतींचे स्थलांतर तसेच बाधित झोपडपट्टीचे पुनर्वसन इ. वर येणारा खर्च राज्य शासनाकडून प्राप्त होईल. या अटींवर डी. पी. रस्ता रुंदीकरण प्रस्ताव शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे. प्रस्तावात नमूद प्रमाणे वस्तुस्थितीचा विचार करुन विषयातील राष्ट्रीय महामार्ग विभाग (एनएचएआय) अंतर्गत सोलापूर शहरातील फ्लायओव्हर (उड्डाणपूल) भाग-१ पुना नाका (एनएच-९) ते सात रस्ता पुणे विजापूर रोड (एनएच-१३) व भाग-२- जुना बोरामणी नाका (एनएच-९) ते जुना कुमठा नाका ते जुळे सोलापूरकडे जाणा-या रस्त्यावरील मोरारका बंगला या रस्त्यावरील अलाईनमेंट प्रमाणे प्रस्तावित आर.ओ.बी. योजनाप्रमाणे नियोजित रस्ता रुंदीप्रमाणे सध्याच्या रस्त्याच्या रुंदीत (४१ मी. रुंदीपर्यंत) वाढ करुन प्रस्तावित डी. पी. रस्ता करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेर बदल करणेचे अनुषंगाने विकास योजना गृहीत धरणेस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळून शासनास पाठविणेस मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १६-६-१७ चे टिपणीस,प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ..४५..ठ. क्र.....८३
दि..१६/८/१७.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर महानगरपालिकेतील आरोग्य विभाग, सॅनिटेशन वर्कशॉप न्यू बुधवारपेठ, अग्निशामक दल, कोंडवाडा सिव्हील समोर नगरअभियंता भांडार, पी.एच.ई. ड्रेनेज विभाग, पी.एच.ई. स्टोअर व इतर लोखंडी पाईप बीड तुकडे कंडम ठरवून मा. नगरअभियंता खात्यामार्फत विक्री करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात अ.क्र. १ ते १२ प्रमाणे स्क्रॅप साहित्याचा तपशील, एकूण वजन, मनपाकडील अपेक्षित रक्कम, मा. कंडमनेशन बोर्डाने सुचविलेली एकूण रक्कम रुपये १,२८,९९,५००/- रक्कम तक्त्यामध्ये नमूद आहे. सदर स्क्रॅप साहित्य विक्री करणेकरिता राज्य व स्थानिक पातळीवर जाहिरप्रसिध्दीकरण देणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ७९ (क) प्रमाणे सक्षम मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ३०-६-१७ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

GandhaleP.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...४८...ठ. क्र....४४
दि...१६।८।१७....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

अस्तित्व मेकर्स फौंडेशन ही संस्था सांस्कृतिक कार्यक्रम करीत असते. सदर संस्था गेल्या पाच वर्षापासून महाराष्ट्रातील पहिली लघुनाटिका स्पर्धेचे आयोजन करीत आहेत. या संस्थेतील सर्व कलाकार हे स्वखर्चातून आजवर ही स्पर्धा वजा कार्यक्रम आयोजित करीत आहेत. या स्पर्धेसाठी संबंध महाराष्ट्रातून जवळपास ३० हून जास्त संघ सहभागी होत असतात. सदर संस्थेची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखिची असल्याने या संस्थेने या वर्षीच्या दिनांक २९ जुलै २०१७ रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ९.०० वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रमासाठी विनामुल्य मागितलेली आहे. तरी सोलापूर शहरातील सांस्कृतिक चळवळ जागृत ठेवण्याचे कार्य अखंडीतपणे चालू ठेवणेकामी सदर संस्थेस हुतात्मा स्मृती मंदिर विनामुल्य भाडेदराने देणे योग्य होणार आहे. तरी अस्तित्व मेकर्स फौंडेशन या संस्थेस सांस्कृतिक कार्यक्रमासाठी दिनांक २९ जुलै २०१७ रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ९.०० वाजपर्यंत विनामुल्य देणेस ही सभा धोरणात्मक मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महानगरपालिकेने जे दर निश्चित केलेले आहेत त्या दरानुसार भाडे आकारणेची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...४८..ठ. क्र......४५
दि..१६.।६.।१८......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे शहरी या योजनेअंतर्गत प्रभागातील झोपडपट्टयांचा पुर्नविकास करणेकरिता प्राध्यान्याने विचार करणेत यावा. रविंद्र बाग झोपडपट्टी, शहापूरे चाळ जवळील झोपडपट्टी व सुभाष बाग जवळील झोपडपट्टयांचा समावेश असून, तसेच सोलापूर शहराच्या विविध झोपडपट्टयामधील बरेचसे लोक या योजनेपासून वंचित रहात असून, त्यांचेकरिता पुन्हा एकदा ऑनलाईन अर्ज करणेकरिता संधी उपलब्ध करुन देणेस सदरची योजना ऑनलाईन चालू करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ...५०.. ठ. क्र. ......८६
दि. २६/६/१८......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

दैनिक सोलापूर तरुण भारतचे मुख्य उपसंपादक श्री. विजयकुमार माधवराव पिसे यांची दैनिक तरुण भारत सोलापूर या दैनिकाचे मुख्य कार्यकारी संपादक पदी नियुक्ती झालेबद्दल तसेच सोलापूर महानगरपालिका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यांत येत आहे. तसेच दैनिक लोकमतचे वरिष्ठ उपसंपादक श्री. राजकुमार दशरथ सारोळे यांची सोलापूर महानगरपालिका पत्रकार संघाचे सरचिटणीस पदी निवड झाल्याबद्दल सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यांत येत आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचा यथोचित सत्कार करणेस , दैनिक सकाळचे वरिष्ठ पत्रकार तथा सोलापूर महापालिका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष श्री विजयकुमार सुरेश सोनवणे यांना २०१७ मध्ये महाराष्ट्र राज्य पत्रकारसंघाचा उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार आणि माणुसकी प्रतिष्ठानचा अदर्श पत्रकार पुरस्कार मिळाला आहे. महापालिकेच्या नागरी समुदय प्रकल्पातील दुर्बल महिलांच्या बचत गटासंदर्भात लिहलेल्या मालिके बद्दल महाराष्ट्र राज्य शासनाने २००७ आणि २००८ या सलग दोन वर्ष सर्वोत्कृष्ट सामाजिक पत्रकारीतेचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन महापालिकेच्या वतीने त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचा यथोचित सत्कार करणेस मान्यता देत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ५२ ठ. क्र. ४०
दि. १६/६/१९७० रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर शहर येथील शनिवार पेठ मधील सुभाष उद्यानाची जागा गोर-गरिबांची सेवा करणेकरिता सोलापूर रमजान बेपारी बझार ट्रस्ट या संस्थेस ९९ वर्षे मुदतीकरिता नाममात्र प्रतिवर्षी र.रु. १/- या प्रमाणे भाडयाने मिळाल्यास, सदर ट्रस्टच्या वतीने सामाजिक सेवा करुन गोर-गरिब जनतेसाठी विविध जिवनोपयोगी व शिक्षणउपयोगी असे उपक्रम त्याठिकाणी राबविले जावून, एक चांगल्या प्रकारचा दिलासा त्या लोकांना देता येवू शकेल. तरी वरील नमूद उद्यानाची जागा सदर ट्रस्टला या विधायक कार्यासाठी देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

सदरचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ...५२... ठ. क्र. ...८६
दि. ९६/५/१९८... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर शहर येथील पाच्छा पेठ मधील रविंद्र उद्यानाची जागा गोर-गरिबांची सेवा करणेकरिता फौजिया वेलफेअर ट्रस्ट सोलापूर या संस्थेस ९९ वर्षे मुदतीकरिता नाममात्र प्रतिवर्षी र.रु. १/- याप्रमाणे भाडयाने मिळाल्यास सदर ट्रस्टच्या वतीने सामाजिक सेवा करुन गोर-गरिब जनतेसाठी विविध जिवनोपयोगी व शिक्षणउपयोगी असे उपक्रम त्याठिकाणी राबविले जावून, एक चांगल्या प्रकारचा दिलासा त्या लोकांना देता येवू शकेल. तरी वरील नमूद उद्यानाची जागा सदर ट्रस्टला या विधायक कार्यासाठी देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

सदरचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेत येत आहे.

Sonkawale P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...५३ ठ. क्र....४१ दि..१६.८.१९७०...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर शहर येथील पाच्छा पेठ मधील रविंद्र उद्यानाची जागा गोर-गरिबांची सेवा करणेकरिता सूरज बहुउद्देशीय संस्था सोलापूर या संस्थेस ९९ वर्षे मुदतीकरिता नाममात्र प्रतिवर्षी र.रु. १/- याप्रमाणे भाडयाने मिळाल्यास सदर ट्रस्टच्या वतीने सामाजिक सेवा करुन गोर-गरिब जनतेसाठी विविध जिवनोपयोगी व शिक्षणउपयोगी असे उपक्रम त्याठिकाणी राबविले जावून, एक चांगल्या प्रकारचा दिलासा त्या लोकांना देता येवू शकेल. तरी वरील नमूद उद्यानाची जागा सदर ट्रस्टला या विधायक कार्यासाठी देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

सदरचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

उप. नोंदी

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...५४...ठ. क्र.......५०
दि..१६।६।१८.....रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूरचे सुपुत्र आणि ज्येष्ठ विधिज्ञ ॲडव्होकेट श्री. आशुतोष कुंभकोणी यांची नुकतीच महाराष्ट्र राज्याचे महाधिवक्ता (Advocate General) पदी राज्य सरकारने नियुक्ती केलेली आहे. ही बाब सोलापूर शहराच्या आणि विधी विभागातील तमाम वकीलांसाठी अतिशय गर्वाची बाब असून, ॲड. श्री. आशुतोष कुंभकोणी यांच्या राज्याच्या महाअभियोक्ता पदी निवड झाल्याबद्दल सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करणेत येत आहे.

Sambhaje P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५५ ... ठ. क्र. ४९
दि. १६/९/१८ ... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

कु. अंकीता मल्लिनाथ हब्बू वय वर्षे २१ रा. ६१६ शुक्रवार पेठ, सोलापूर यांना किडनीचा विकार झाला असून त्यांच्यावर अश्विनी सहकारी रुग्णालय सोलापूर येथे औषधोपचार चालू आहे. त्यांची किडनी निकामी झालेली असून किडनी प्रत्यारोपणासाठी १० लाख रु. खर्च येणार आहे. कु. अंकिता मल्लिनाथ हब्बू यांची घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने इतका मोठा खर्च ते करुन शकणार नाहीत तरी त्यांना सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त वैद्यकीय आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

(सही)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५६ ठ. क्र. ५२
दि. १६/५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

श्री. गणेश विनायक शिंदे, राहणार ६५५ अण्णाभाऊ साठे नगर न्यू पाच्छा पेठ सोलापूर यांची आई लक्ष्मी विनायक शिंदे यांना ह्यदयविकाराचा आजार असून त्यांच्यावर सेंट्रल मल्टिस्पेशॅलिटी हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटर सोलापूर येथे चालू आहे. त्यांचे उपचाराकरिता ३ ते ३.५ लाख खर्च अपेक्षित आहे. श्री. गणेश विनायक शिंदे यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची व हालाखीची असल्याने त्यांना सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त वैद्यकीय आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५७ ठ. क्र. ५३
दि. २६/९/१७ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

श्री. विलास शिवराम धोत्रे रा. १३८ विडी घरकुल, सोलापूर यांची मुलगी कु. ऋतुजा विलास धोत्रे वय वर्ष ४ हिला निमोनिया हा आजार झालेला असून सदर आजारावर श्री. मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र येथे उपचार केले असून अद्याप र.रु. ५०,०००/- इतका खर्च आला आहे. सदर आजारावर उपचार करणेकरिता कर्ज काढून उपचार करण्यात आलेले आहे. श्री. विलास शिवराम धोत्रे हे खाजगी नोकरी करीत असून त्यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची व हालाकीची असल्यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

(सही)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५५ ठ. क्र. ४८ दि. १६।८।१७ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार उपायुक्त यांचे अधिपत्याखाली असलेले विभाग व कामकाज श्री. श्रीकांत मायकलवार, अतिरिक्त आयुक्त यांचे अधिपत्याखाली सोपविण्यात येत असलेबाबत मा. प्र. आयुक्त तथा जिल्हाधिकारी, सो.म.पा. यांचेकडील जा.क्र. नआ/वै/१०२, दिनांक १५-७-१७ चे कार्यालयीन आदेश मा. महानगरपालिकेच्या निदर्शनास आणणेबाबत

१) सार्व.आरोग्य अभियंता विभागाचे संपूर्ण कामकाजावर देखरेख व नियंत्रण २) नगर अभियंता विभागाचे संपूर्ण कामकाजावर देखरेख व नियंत्रण ३) स्थानिक संस्था कर विभागाचे संपूर्ण कामकाजावर देखरेख व नियंत्रण ४) एनयुएचएम, एनयुएलएम, युसीडी, महिला व बाल कल्याण तसेच क्रिडा विभागाचे संपूर्ण कामकाजावर देखरेख व नियंत्रण ५) मंडई विभागाचे संपूर्ण कामकाजावर देखरेख व नियंत्रण ६) दलित वस्ती सुधारणा व रमाई आवास योजना, जनगणना व निवडणूक कार्यालयाकडील कामकाजावर देखरेख व नियंत्रण ७) स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापनाकडील सर्व कामकाजावर देखरेख व नियंत्रण ८) विभागीय कार्यालय क्र. ५ ते ८ अंतर्गत कामकाजावर नियंत्रण अधिकारी तसेच परिवहन व्यवस्थापक पदाचा अतिरिक्त कार्यभार अतिरिक्त आयुक्त यांचेकडे राहील.

सदर आदेशाचे माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ५८ ...ठ. क्र. ५५ दि. १६/१२/१७ ...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेची कामे पूर्ण करीत असताना सोलापूर शहरातील पाणी पुरवठयावर होणा-या परिणामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव अमृत योजनेतील उपांगे निहाय कामे संबंधित ठेकेदार यांना सोलापूर महानगरपालिकेकडून प्रस्तावात नमूद तक्त्याप्रमाणे सर्व कामे त्यांना दिलेल्या विहीत वेळेत पूर्ण करणेचे आदेश दिलेले आहेत. प्रस्तावात नमूद तक्त्यात महापालिकेने ताब्यात द्यावयाची उपांगे व त्यासाठी लागणारा कालावधी आणि संबंधित मक्तेदारांनी सदरची कामे पूर्ण करणेकरिता लागणारा कालावधी हे दर्शविले आहे. प्रस्तावात नमूद सर्व उपांगे वेळोवेळी पूर्ण करणेकरिता शटडाऊन घेणे, जलशुध्दीकरण केंद्रातील क्लॅरीफायर व फिल्टर बेड दुरुस्तीसाठी मक्तेदार याच्या ताब्यात देणे व तसेच कोंडी एम.बी.आर. बाळे येथील पाईप लाईन टाकणे करिता तेथील अतिक्रमण काढून घेणे इत्यादी सर्व कार्यवाहीस मा. सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांनी आखून दिलेल्या कालबध्द कार्यक्रमाप्रमाणे कार्यवाही ठेवणेस व सदरचे कार्यवाही ठेवणेचे कालावधीत शहर पाणीपुरवठयावर प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे परिणाम होणार आहे ही वस्तुस्थिती आहे. तथापि अमृत योजनेचे काम वेळेत झालेस भविष्यात शहर पाणीपुरवठयामध्ये सुधारणा होणार आहे व शासन स्तरावर सदरहू योजना वेळेत पूर्ण करणेबाबत सतत पाठपुरावा चालू आहे. त्यामुळे प्रस्तावात नमूद प्रमाणे ठेवण्यात येणा-या कार्यवाहीची माहिती मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव पाठविणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १४-७-१७ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

ज्या ठिकाणी पाणी पुरवठा विस्कळीत होणार आहे त्या ठिकाणी ३ दिवसाआड पाणी पुरवठा असतांना चार दिवसाआड, पाच दिवसाआड पाणी पुरवठा होणार आहे. सोलापूर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा खात्याचे जे संबंधित खातेप्रमुख, अधिकारी असतील त्यांनी त्या ठिकाणी पाणी पुरवठा करण्यासाठी काय काय नियोजन केले आहे ? त्या ठिकाणी पाणी पुरवठयासाठी जास्तीचे टँकर लावावे लावावे. बोअर नादुरुस्त असतील तर त्या रिपेअर कराव्या , इलेक्ट्रीक पंप नादुरुस्त असतील तर दुरुस्त करुन घ्यावे , सौर उर्जेवरील प्रकल्प सुरु केले आहेत ते सुस्थितीत चालू आहेत काय ते पहावे व नादुरुस्त असतील तर दुरुस्त करण्यात यावे.ज्या ज्या विहीरी अधिग्रहण केलेल्या आहेत. त्या विहीरीवरुन पाणी पुरवठा करावा याचे संपूर्ण नियोजन करुनच सदर ठिकाणी शटडाऊन घेऊन काम हाती घेण्यांत यावे .

सदरचे काम डिसेंबर २०१७ अखेर पर्यंत पूर्ण करणेत यावे.यास ही सभा मान्यता देत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

परवतधा...                                                            ... विभाग कामे संबंधित

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुल्ली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज....६०...ठ. क्र.....५६
दि..१६।७।१७...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

अमरनाथ यात्रेसाठी भक्तगण जात असताना त्यांच्या बसवर आतंकवादयांनी केलेल्या भ्याड हल्ल्यामध्ये सात श्रध्दाळू लोकांचे मृत्यू झाले. या आतंकवादी हल्ल्याचा ही सभा निषेध करीत आहे. आणि त्या बसचा चालक श्री. महंमद सलीम यांनी आपला जीव धोक्यात घालून ४० श्रध्दाळू लोकांचे जीव वाचविल्याबद्दल ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

P.P.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ६१ ठ. क्र. ५८ दि. १६/९/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर शहरातील श्री.अविनाश किसन कांबळे रा. रंगभवन, सोलापूर हा एक उत्तम जलतरण पटु असून ते राष्ट्रीय स्तरामध्ये गुजरात येथे झालेले ३rd Stundents Olympic National Games २०१७ येथे सदर खेळाडुची निवड श्रीलंका येथे होणाऱ्या ३rd Stundents Olympic Aasociation Internation Games २०१७ करीता झालेली आहे. तरी श्री.अविनाश किसन कांबळे यांची परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने त्यांना श्रीलंका येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी जाण्याकरीता महापौर निधीतून जास्तीत जास्त आर्थिक सहाय्य करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...६२...ठ. क्र....५८
दि...१६/१/१९१८...रोजी ठेवता चालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

श्री. राजेश शंकर बसुदे रा. ५३९, साखर पेठ, सोलापूर यांना पॅरलेसेस हा आजार झाला असून त्यांच्यावर वळसंगकर हॉस्पीटल येथे उपचार केले असून रु. २,५०,०००/- इतका खर्च आला आहे. सदर आजारावर सध्या उपचार चालू असून दरमहा रु. ५०००/- इतका खर्च येत आहे. श्री. राजेश बसुदे हे घरातील कर्ता पुरुष असून सदर आजारावर उपचार करणेकरिता कर्ज काढून उपचार करण्यात आलेले आहे. श्री. राजेश बसुदे हे खाजगी नोकरी करीत असून त्यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची व हालाकीची असल्यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त वैद्यकीय आर्थिक मदत मिळणेकामी मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

०१८

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ६३ ठ. क्र. ४९
दि. २६।९।१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

चि. मंथन सिद्राम कंदलगी राहणार सोलापूर वय वर्षे १३ हा श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल सोलापूर यांची आंतरराष्ट्रीय स्टुडंट ऑलिम्पीक कौन्सील ऑफ एशिया यांनी दिनांक २७-७-२०१७ ते ३०-७-२०१७ या दरम्यान कोलंबो श्रीलंका येथे आयोजित केलेल्या नृत्य स्पर्धेसाठी उज्जैन येथे झालेल्या राष्ट्रीय पातळीवरुन निवड झालेली आहे. याबाबतची सर्व कागदपत्रे सोबत जोडलेली आहेत. परंतू चि. मंथन यांचे वडील श्री. कंदलगी यांनी आर्थिक परिस्थिती बरोबर नसल्याने त्यांनी आर्थिक सहकार्य करणेविषयी विनंती केलेली आहे. तरी चि. मंथन सिद्राम कंदलगी यांस प्रोत्साहनपर सदर नृत्य स्पर्धेसाठी कोलंबो येथे पाठविणेकामी जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज..६४..ठ. क्र.....६०
दि..१६।९।१७.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर महानगरपालिकेचे नगरसचिव श्री. पी. पी. दंतकाळे यांचे काम अत्यंत असमाधानकारक असल्याने त्यांना पूर्ववत त्यांचे पदावर पाठविण्यास मान्यता देणेत येत आहे. यामुळे रिक्त होणा-या नगरसचिव पदावर यापूर्वी सहा. आयुक्त (विशेष) म्हणून सेवानिवृत्त झालेले श्री. ए. ए. पठाण यांची मा. मनपा ठ.क्र. २६२, दिनांक १९-१-२०१६ ते ५-२-२०१७ अखेर एक वर्षाकरिता मानधनावर नियुक्त करण्यात आली होती. श्री. ए.ए. पठाण यांचे काम उत्कृष्ठ व समाधानकारक असून, त्यांना कामाचा मोठा अनुभव असल्याने त्यांना नगरसचिव या पदावर एक वर्षाकरिता मानधनावर नियुक्ती करण्यास तसेच त्यांना या पदाकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीप्रमाणे असलेल्या अधिकारानुसार काम करण्यास ही सभा धोरणात्मक मान्यता देणेस्तव आलेल्या प्रसतावाचे अवलोकन कले.

सदरचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...६५...ठ. क्र....६९ दि..१६।८।१८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर महानगरपालिकेचे नगरसचिव श्री. पी. पी. दंतकाळे यांचे काम अत्यंत असमाधानकारक असल्याने त्यांना पूर्ववत त्यांचे पदावर पाठविण्यास मान्यता देणेत येत आहे. यामुळे रिक्त होणा-या नगरसचिव पदावर यापूर्वी सहा. आयुक्त (विशेष) म्हणून सेवानिवृत्त झालेले श्री. ए. ए. पठाण यांची मा. मनपा ठ.क्र. २६२, दिनांक १९-१-२०१६ ते ५-२-२०१७ अखेर एक वर्षाकरिता मानधनावर नियुक्त करण्यात आली होती. श्री. ए.ए. पठाण यांचे काम उत्कृष्ठ व समाधानकारक असून, त्यांना कामाचा मोठा अनुभव असल्याने त्यांना नगरसचिव या पदावर एक वर्षाकरिता मानधनावर नियुक्ती करण्यास तसेच त्यांना या पदाकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीप्रमाणे असलेल्या अधिकारानुसार काम करण्यास ही सभा धोरणात्मक मान्यतेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

सदरचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेस ही सभा मान्यता देत आहे.

Danthkale P.P.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका.

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकुब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ६६ ठ. क्र. ६२
दि. १६/५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

स्वच्छ भारत मिशन स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत सामुदायिक शौचालय बांधणे कामाचे प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करणेत आलेले पूर्वगणनपत्रक क्र./ र.रु. १,२८,५१,०७३/- यांस मा. स्थापत्य समितीची मंजूरी मिळून मा. सर्वसाधारण सभेची सक्षम मंजूरी मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक २३-२-१७ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ०४, दिनांक १८-७-२०१७ चे शिफारशीने आलेले प्रकरणाचे अवलोकन केले.

सदर सामुदायीक शौचालये ही कोण कोणत्या ठिकाणी बांधण्यात येणार आहेत. या तपशिलासह व बजेट अभिप्रायासह फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासलो/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. नं. २७/६८ ........ठ. क्र. ६३
दि. २६/६/१८.... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

परिवहन उपक्रमाकडील पेन्शनर सेवकांचे दरमहा लागणारी पेन्शनकरिता निधी उपलब्ध होवून मिळणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे परिवहन उपक्रमाकडील निवृत्तीवेतनधारकांची एकूण संख्या ही ५५८ इतकी असून, सेवानिवृत्त सेवकांचे प्रा.फंड, तोषदान व इतर देय रक्कमा आजला रक्कम रु. १० कोटी, शासकीय देणी व इतर थकीत देणी असे मिळून एकूण रक्कम रु. २७,१२,८९,५३८/- थकीत असून ती प्रस्तावातील तक्त्यात नमूद आहे. सोलापूर महानगरपालिकेकडून परिवहन उपक्रमाकडील सेवानिवृत्त सेवकांना निवृत्तीवेतन अदा करणेकामी मा.म.न.पा.ठराव क्र. ४४०, दिनांक ९-२-२००५ अन्वये परिवहन उपक्रमाची आर्थिक परिस्थिती हलाखिची असल्याने दरमहाचे पेन्शन देणेस मान्यता देणेत येत आहे असा ठराव पारित करणेत आलेला आहे. सन २००५ पासून मनपाचे अ अंदाजपत्रकात परिवहन निवृत्ती वेतनधारकांसाठी स्वतंत्र अनुदानाची तरतूद करणेत आलेली आहे. त्याप्रमाणे आजतागायत पेन्शन सेवकांचे वेतन मनपा कडून मिळत आहे. तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता देखील उपक्रमाकडील सेवानिवृत्त सेवकांचे पेन्शन अदा करणेकामी मनपाचे अ-अंदाजपत्रकामध्ये रक्कम रु. ५ कोटी इतक्या रक्कमेची अनुदान म्हणून तरतूद करणेत आलेली आहे. तरी उपक्रमाकडील सेवानिवृत्त सेवकांचे पेन्शन अदा करणेकामी दरमहाप्रमाणे प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सेवानिवृत्त सेवकांचे पेन्शनकरिता दरमहा लागणारी रक्कम मनपाचे अ अंदाजपत्रकातील अनुदान तरतूद रक्कमेतून उपलब्ध होवून मिळणेस्तव मा.कडे कार्यालय अधिक्षक नि लेखापाल परिवहन उपक्रम यांनी निवेदन सादर केले असता मा.यांनी माननियांचे सुचनेनुसार याबाबत फेर निर्णयासाठी सर्वसाधारण सभेपुढे सादर करावा असा शेरा नोंदविलेला असून त्याप्रमाणे सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे तातडीने सादर करणेकामी मा. अतिरिक्त आयुक्त तथा परिवहन व्यवस्थापक यांचे दि. १७-७-१७ चे टिपणीने आलेले प्रकरणाचे आवलोकन केले.

सन २००५ पासून अंदाजपत्रकात परिवहन सेवानिवृत्त सेवकांसाठी स्वतंत्र अनुदानाची तरतूद करणेत येते. त्याप्रमाणे या वर्षी झालेल्या सन २०१७-१८चे अंदाजपत्रकात देखील निवृत्त वेतनधारकांना अनुदानाची तरतूद करणेत आलेली आहे. त्या तरतूदीतून निवृत्ती वेतन आदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

(Sd/-) P.A.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकुब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. नगर ९/ee ......ठ. क्र. ......६४
दि. २६/९/१८ :....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर शहरातील धर्मवीर संभाजी तलावाचा (कंबर तलाव) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजने अंतर्गत संवर्धन व सुशोभिकरण करणेकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेबाबत यापूर्वी ७०:३० प्रमाणे अगोदरचा मा. सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक २७२ दि.१९/०१/२०१६ रोजी पारित झालेला आहे. यामध्ये पुर्व गणनपत्र र.रु.८,०७,०३,६००/- पैक केंद्र शासन ७०% व मनपाचा हिस्सा ३०% प्रस्तावात नमुद प्रमाणे र.रु.८.०७ कोटीच्या सुधारीत पुर्वगणनपत्रकास मान्यता दिलेले आहेत. व मनपा हिस्स्याचे रक्कम रुपये २.४२ कोटी ७०:३० प्रमाणे २०१६-१७ च्या तरतूदीत मान्यता देणेत आलेली आहे.राष्ट्रीय नदी संवर्धन संचनालय, निदेशक , नवि दिल्ली, यांनी तलावास भेट दिली. व दि.२७/१२/२०१६च्या पत्रानुसार मा.केंद्र शासनाच्या सुधारीत मार्ग दर्शक तत्वानुसार निधी वाटपाचे सुत्र ६०:४० झालेचे कळविले आहे.व प्रस्तावात नमुद प्रमाणे सन २०१६-१७ जिल्हा दर सुचीनुसार सदर प्रकल्प अहवाल पुनश्च सुधारीत करुन ६०:४० प्रमाणे रक्कम रुपये १३,१८,८२,९२०/- पैकी केंद्र शासन हिस्सा रक्कम रुपये ७,९१,२९,७५२/- व सोमपा हिस्सा रक्कम रुपये ५,२७,५३,१६८/- इतका अपेक्षित खर्च असलेला अंतिम सुधारीत प्रकल्प अहवाल दि.०१/०७/२०१७ रोजी मे.एन्वीक्लीन असोसिएट्स, कोल्हापूर.यांच्या कडून मनपास कळविणेत आलेला आहे. त्यानुसार प्रस्तावात नमुदप्रमाणे डॉ.आर.के.सिंग, डी.जी.एम.(प्रोजेक्ट) हुडको, नवि दिल्ली यांचे दि.१४/०६/२०१६ च्या पत्रानुसार एकूण १३ मुद्दे उपस्थित केले आहे. त्यापैकी मुद्दा क्रमांक १२साठी मनपा ठराव होणे अपेक्षित असून उर्वरीत मुद्दयांची पूर्तता मे.एन्वीक्लीन असोसिएट्स, कोल्हापूर यांचे मार्फत झालेल आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१६-१७ च्या जिल्हा दर सचीनुसार व इतर जरुरी बाबीनुसार रक्कम रुपये १३,१८,८२,९२०/- इतका खर्च अपेक्षित असलेला सुधारीत प्रकल्प अहवालास व मा.केंद्र शासन सुधारीत मार्गदर्शक तत्वानुसार ६०:४० प्रमाणे आर्थिक निधी उपलब्ध करण्याच्य निकषानुसार मा.केंद्र शासन खर्च रुपये ७,९१,२९,७५२/- व मनपा हिस्सा ४०% प्रमाणे रक्कम रुपये ५,२७,५३,१६८/- या प्रकल्पासाठी मनपा हिस्स्यास तरतूद होउन मिळणेकामी मनपा ठराव पारित होणे करीता व वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्च रक्कम रुपये २२,६,८००/- सो.म.पा. मार्फत करण्यास व दरम्यानच्या काळात जिल्हा दर सुची बदलल्यास त्यानुसार व बदल होणा-या रक्कमेस तसेच योजनेमध्ये त्या अनुषंगाने बदल करणेस त्या अनुषंगाने मा.शासनाकडे आवश्यक तो पत्र व्यवहार करणेच्या अनुषंगाने अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणेस्तव.मा.आयुक्त यांचे दि.१४/०९/२०१७ टिपणीने आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

सदर कामाकरिता सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकामधील भांडवली कामाच्या खर्चाच्या तक्त्यामधील अ.क्र. १ ते ६३ मधील अ.क्र. ५३ धर्मवीर संभाजी तलावाचे राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेअंतरगंत तलावाचे संवर्धन व सुशोभिकरण करणे म.न.पा. हिस्सा र.रु.३,००,००,०००/-ची तरतूद करणेत आली असून या तरतूदीमधून सदरचे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned by CamScanner